११ हजार ५४० वीज ग्राहकांनी घेतला अभय योजनेचा लाभ

कोल्हापूर : बिलाच्या थकबाकीमुळे वीज कनेक्शन कायमस्वरूपी तोडलेल्या (पी.डी.) राज्यातील घरगुती, व्यावसायिक आणि औद्योगिक वीज ग्राहकांसाठी महावितरणने अभय योजना आणली आहे. ३१ मार्चपर्यंत सुरू असलेल्या या योजनेत वीजबिलाच्या थकबाकीवरील संपूर्ण व्याज आणि विलंब आकार माफ होत आहे. कोल्हापूर परीमंडळातील ११ हजार ५४० वीज ग्राहकांनी ९ कोटी ६४ लाख रुपयांची थकबाकी भरली आहे. उर्वरित पी.डी. ग्राहकांनीही योजनेचा लाभ घेत थकबाकीमुक्त होऊन कायदेशीर कारवाई टाळावी, असे आवाहन महावितरणचे मुख्य अभियंता स्वप्नील काटकर यांनी केले आहे.

३१ मार्चपर्यंत थकित बिलामुळे कायमस्वरूपी वीजपुरवठा खंडित झालेल्या (पी.डी.) महावितरणच्या ग्राहकांसाठी गतवर्षी १ सप्टेंबरपासून अभय योजना सुरू करण्यात आलेली आहे. आतापर्यंत कोल्हापूर परीमंडळातील ११ हजार ५४० ग्राहकांनी या योजनेचा लाभ घेतला असून त्यांच्याकडून ९ कोटी ६४ लाख रुपयांचा भरणा केला आहे. कोल्हापूर जिल्ह्यातील ६ हजार ९०० ग्राहकांनी ६ कोटी ५३ लाख रुपयांचा भरणा केला आहे तर सांगली जिल्ह्यातील ४ हजार ६४० ग्राहकांनी ३ कोटी ११ लाख रुपयांचा भरणा केला आहे. यापैकी ७८७ ग्राहकांनी नवीन वीज जोडणी करता अर्ज केला असून, ४६५ ग्राहकांना वीज जोडणी देण्यात आली असून उर्वरित ग्राहकांची प्रक्रिया सुरू आहे. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निकालानुसार कोणत्याही जागेच्या मालक किंवा खरेदीदार किंवा ताबेदार यांनी वीजबिलाची थकबाकी रक्कम भरणे बंधनकारक आहे. रक्कम न भरल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते. त्यामुळे वीज ग्राहकांनी सवलतीचा लाभ घेऊन चिंतामुक्त व्हावे, असे आवाहन महावितरणने केले आहे.

अशी आहे अभय योजना

महावितरण अभय योजनेनुसार थकबाकीदारांनी केवळ मूळ थकबाकीचा भरणा केल्यास संपूर्ण १०० टक्के व्याज व विलंब आकाराची (दंड) रक्कम माफ होत आहे. तसेच मूळ थकबाकीचा एकरकमी भरणा केल्यास लघुदाब ग्राहकांना आणखी १० टक्के तर उच्चदाब ग्राहकांना आणखी ५ टक्के सूट मिळत आहे. यासोबतच मूळ थकबाकीची सुरवातीला ३० टक्के रक्कम भरून उर्वरित ७० टक्के रक्कम व्याजमुक्त सहा हप्त्यांत भरण्याची देखील सोय आहे. थकबाकीमुक्तीसाठी वीजग्राहकांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन महावितरण ने केले आहे. परंतु राज्यातील ग्राहकांचा वाढता प्रतिसाद लक्षात घेऊन ही योजना ३१ मार्चपर्यंत चालू ठेवण्याचा निर्णय घेतल्यामुळे या योजनेत अजूनही सहभागी होऊ इच्छिणाऱ्या ग्राहकांना दिलासा मिळणार आहे.

पाकिस्तानी तुरुंगातून २२ मच्छिमारांची आज सुटका

मेघा परमार/मुंबई

कराचीच्या मलीर तुरुंगातून २२ भारतीय मच्छिमारांची उद्या सुटका करण्यात येणार आहे. अनेक मच्छीमार अनेक वर्षांपासून या तुरुंगात आहेत. यातील अनेक मच्छिमारांची प्रकृती बिघडलेली आहे. त्यांना टीबी, तणाव आदी विकार जडले आहेत. वाघा-अट्टारी सीमेवरून ते भारतात परतणार आहेत. पाकिस्तानातील 'इधी फाऊंडेशन'ने या मच्छिमारांची सीमेपर्यंत नेण्याची व्यवस्था केली आहे. अजून १९४ भारतीय मच्छिमार पाकिस्तानच्या तुरुंगात आहेत.

वरिष्ठ पत्रकार व शांतता कार्यकर्ते जतीन देसाई यांनी भारत व पाकिस्तानला मच्छिमारांची सुटका करण्याची विनंती केली. या मच्छिमारांची प्रकृती खालावली आहे. त्यामुळे त्यांची तत्काळ सुटका करावी, तसेच त्यांना वैद्यकीय उपचारांची गरज असल्याचे देसाई यांनी सांगितले. या मच्छिमारांवरील उपचारांची जबाबदारी संबंधित राज्य व केंद्रशासित प्रदेशाने घ्यावी. या कैद्यांची प्रकृती गंभीर आहे. त्यांना वैद्यकीय उपचारांची गरज आहे, असे आवाहन त्यांनी केले.

बीबीसी, संचालकांना ३.४४ कोटी दंड

नवी दिल्ली : 'ईडी'ने बीबीसी इंडिया व त्यांच्या संचालकांना परदेशी निधी नियमांचे उल्लंघन केल्याप्रकरणी ३.४४ कोटी रुपयांचा दंड ठोठावला आहे. ईडीने सांगितले की, बीबीसी इंडियाने डिजिटल मीडिया कंपन्यांसाठी निर्धारित केलेल्या २६ टक्के परदेशी भांडवलाच्या सीमेचे पालन केले नाही. ते १०० टक्के ठेवले. हा प्रकार म्हणजे भारतीय कायद्याचे सरळसरळ उल्लंघन आहे.

भारत को-ऑपरेटिव्ह बँक (मुंबई) लि.

(मल्टी-स्टेट शेड्युल्ड बँक)
मध्यवर्ती कार्यालय : "मरुतागिरी", प्लॉट क्र. १३/९ए, सोनावाला रोड, गोरेगाव (पूर्व), मुंबई - ४०००६३.
फोन :- ६१८९००८८/६१८९०१३४/६१८९००८३.

कब्जा सूचना

ज्याअर्थी,

निम्नस्वाक्षरीकार, **भारत को-ऑपरेटिव्ह बँक (मुंबई) लि.** चे प्राधिकृत अधिकारी या नात्याने सिक्युरिटायझेशन ॲन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेटस् ॲन्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अन्वये आणि कलम १३(१२) सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ सहवाचता नियम ३ अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून दिनांक ०७.०१.२०२२ रोजी मागणी सूचना जारी करून **मुख्य कर्जदार : मे. राजकिरण फॅब्रिक्स प्रायव्हेट लिमिटेड, संचालक आणि संयुक्त/सह-कर्जदार: श्री. जब्बारसिंग अचलिंगजी पुरोहित आणि श्री. गिरीश (विनोदकुमार) जब्बारसिंग पुरोहित, संयुक्त/सह-कर्जदार: श्री. दशरथ जब्बारसिंग पुरोहित** यांना सूचनेतील नमूद रक्कम **रु. ७,४७,२८,१२४/- (रुपये सात कोटी सत्तेचाळीस लाख अठ्ठावीस हजार एकशे चोवीस मात्र)** या रकमेची परतफेड सदर सूचनेच्या प्राप्तीच्या ६० दिवसांत करण्यास सांगितले होते.

रकमेची परतफेड करण्यास सदर कर्जदार असमर्थ ठरल्याने, सदर कर्जदार आणि सर्वसामान्य जनतेस याद्वारे सूचना देण्यात येते की, निम्नस्वाक्षरीकारांनी खटला क्र. ३०५९/२०२२ मधील जिल्हा दंडाधिकारी, ठाणे द्वारे मंजूर २०.०६.२०२४ रोजीच्या आदेशाच्या निष्पादनातील तहसीलदार, भिवंडी मार्फत खाली वर्णन करण्यात आलेल्या मिळकतीचा प्रत्यक्ष कब्जा निम्नस्वाक्षरीकारांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून सदर ॲक्टच्या कलम १३(४) अंतर्गत सहवाचता सदर रूल्सच्या नियम ९ अन्वये दिनांक **२० फेब्रुवारी, २०२५** रोजी घेतला आहे.

विशेषत: सदर कर्जदार आणि सर्वसामान्य जनतेस याद्वारे इशारा देण्यात येतो की, सदर मिळकतीशी कोणताही व्यवहार करू नये आणि सदर मिळकतीशी करण्यात आलेला कोणताही व्यवहार हा **भारत को-ऑपरेटिव्ह बँक (मुंबई) लि.** च्या रक्कम **रु. ७,४७,२८,१२४/- (रुपये सात कोटी सत्तेचाळीस लाख अठ्ठावीस हजार एकशे चोवीस मात्र)** त्यासह त्यावरील पुढील व्याज आणि प्रभार या रकमेच्या भाराअधीन राहील.

मिळकतीचे वर्णन

मोजमापित ३१५२.४० चौ. फू. बिल्ट अप क्षेत्र आणि तेथे बांधकामित इमारत समाविष्टीत तळ मजला, मोजमापित ३१५१.१० चौ. फू. बिल्ट अप क्षेत्र आणि १ला मजला (मेझानाईन मजला), मोजमापित ३१५१.१० चौ. फू. बिल्ट अप क्षेत्र, प्लिंथ क्र. सी-१, शेड प्लॉट क्र. सी, ओसवाल इंडस्ट्रियल कॉम्प्लेक्स-२, स. क्र. १२८/१-पी, स. क्र. १२६/४ त्यासह उप विभाजीत आणि उप नोंदणी कार्यालय भिवंडी आणि विभाग आणि जिल्हा ठाणे आणि जिल्हा परिषद ठाणे, गाव सोनाळे, तलाठी साजा, टेमघर, तालुका भिवंडी, जिल्हा ठाणे येथे स्थित फॅक्टरी जमिनीचे सर्व भाग आणि विभाग, मे. राजकिरण फॅब्रिक्स प्रायव्हेट लिमिटेड यांच्या मालकीचे आणि सीमाबध्द द्वारे: पूर्व: रस्ता, पश्चिम: सी-२, उत्तर: केमिकल फॅक्टरी, दक्षिण: रस्ता

मोजमापित २१६.६६ चौरस मीटर्स त्यासह गाळा क्र. ५४६, त्यावर बांधण्यात आलेला तळ मजला समाविष्टीत, मोजमापित १९७५ चौ. फू. बिल्ट अप क्षेत्र आणि १ला मजला, मोजमापित ९७५ चौ. फू. बिल्ट अप क्षेत्र, महावीर नगर, पाईपलाईन रोड, भिवंडी कल्याण रोड लगत, सर्व्हे क्र. १२, हिस्सा क्र. १ (भाग) धारक, गाव टेमघर, तालुका भिवंडी, जिल्हा ठाणे-४२१३०८ येथे स्थित जमिनीचे भाग आणि विभाग, श्री. जब्बारसिंग अचलिंगजी पुरोहित, श्री. विनोद जब्बारसिंग पुरोहित (उर्फ गिरीश जब्बारसिंग पुरोहित) आणि श्री. दशरथ जब्बारसिंग पुरोहित यांच्या संयुक्त मालकीचे आणि सीमाबध्द द्वारे: पूर्व: गाळा क्र. ५४५, पश्चिम: गाळा क्र. ५४७, उत्तर: मिळकतीच्या रस्त्याअंतर्गत रस्ता, दक्षिण: मोकळा प्लॉट.

मोजमापित २१६.६६ चौ. मीटर्स त्यासह गाळा क्र. ५४७, त्यावर बांधण्यात आलेला समाविष्टीत तळ मजला, मोजमापित १९७५ चौ. फू. बिल्ट अप क्षेत्र आणि पहिला मजला, मोजमापित ९७५ चौ. फू. बिल्ट अप क्षेत्र, महावीर कंपाऊंड, पाईपलाईन रोड, भिवंडी कल्याण रोड लगत, सर्व्हे क्र. १२, हिस्सा क्र. १ (भाग), गाव टेमघर, तालुका भिवंडी, जिल्हा ठाणे-४२१३०८ येथे स्थित जमिनीचे भाग आणि विभाग, श्री. जब्बारसिंग अचलिंगजी पुरोहित यांच्या मालकचे आणि सीमाबध्द द्वारे: पूर्व: गाळा क्र. ५४६, पश्चिम: गाळा क्र. ५४८, उत्तर: रस्ता, दक्षिण: मोकळा प्लॉट.

दिनांक : २०.०२.२०२५ सही/-
ठिकाण : भिवंडी, ठाणे प्राधिकृत अधिकारी

NOTICE OF LOSS OF SHARE CERTIFICATES

NOTICE is hereby given that the following share certificates issued by **ICICI Bank Ltd.** ("the Company) are stated to have been lost or misplaced and the registered share hooders have applied for issue of duplicate share certificates.

Folio No.	Registered Share holder	Certificate No.	Distinctive Nos. From	Distinctive Nos. To	Equity Shares
1042846	JAL RUTTONSHA KAVARANA MINOO RUTTONSHA KAVARANA MALCOLM JAMSHED KAVARANA	104396 1751238	32278756 6412527188	32280520 6412527363	1765 176

Any person who has a claim in respect of the said certificates should lodge such claim with all supporting documents with the Company at its Registered Office at ICICI Bank Tower, Near Chakli Circle, Old Padra Road, Vadodara, Gujarat - 390 007 or Kfin Technologies Ltd., Selenium Tower B, Plot 31-32, Gachibowli, Financial District, Hyderabad 500032. If no valid or legitimate claim is received within 15 days from the date of publication of this notice, the Company will proceed to issue duplicate certificates to the shareholders listed above and no further claim would be entertained from any person.

JAL RUTTONSHA KAVARANA
MINOO RUTTONSHA KAVARANA
MALCOLM JAMSHED KAVARANA
(Applicants)

Place : Mumbai
Date : 21.2.2025

प्रपत्र क्र. ३
[नियम-१३(१)(ए) पहा)]

कर्ज वसुली न्यायाधिकरण मुंबई (डीआरटी ३)

१ ला मजला, एमटीएनएल टेलिफोन एक्स्चेंज बिल्डिंग, सेक्टर-३०ए, वाशी, नवी मुंबई-४०० ७०३.

खटला क्र.: ओए/१०७५/२०२४

कर्ज वसूली न्यायाधिकरण(कार्यवाही) रुल्स, १९९३ च्या नियम ५ च्या उप-नियम (२ए) सहवाचता ॲक्टच्या कलम १९ च्या उप-कलम(४) अंतर्गत समन्स.

स्टेट बँक ऑफ इंडिया परि. क्र.११३७२
विरुद्ध
नाथकृपा ट्रेडिंग सुनंदा अनिल डुंबरे

प्रति,

(१) नाथकृपा ट्रेडिंग सुनंदा अनिल डुंबरे, डी/डब्ल्यु/एस/ओ-सुनंदा अनिल डुंबरे, खोली क्र.३, अनिल निवास, काजूपाडा अरविंद मसाला स्टोअरजवळ, बोरीवली पूर्व, मुंबई, महाराष्ट्र - ४०००६६

(२) सुनंदा अनिल डुंबरे, खोली क्र.३, अनिल निवास, काजूपाडा अरविंद मसाला स्टोअरजवळ, बोरीवली पूर्व, मुंबई, महाराष्ट्र - ४०००६६

समन्स

ज्याअर्थी, वरील नमूद **ओए/१०७५/२०२४** नामदार प्रबंधक/पीठासिन अधिकाऱ्यांसमोर **१८/०४/२०२४** रोजी सूचीबद्ध केला होता.

ज्याअर्थी, नामदार न्यायाधिकरणाने कृपावंत होऊन **रु. ३३५३०८०/-** च्या कर्जाच्या वसुलीसाठी तुमच्याविरुद्ध दाखल केलेल्या ॲक्टच्या कलम १९(४) अंतर्गत सदर अर्जावर (ओ.ए.) समन्स/सूचना जारी केली. (जोडलेल्या दस्तावेजांच्या प्रतींसह अर्ज).

ॲक्टच्या कलम १९ च्या पोट-कलम (४) नुसार, तुम्हा प्रतिवादींना खालीलप्रमाणे निर्देश देण्यात येत आहेत.

(i) विनंती केलेल्या अनुतोषांना मंजुरी का देऊ नये त्याची समन्सच्या बजावणीच्या तीस दिवसांत कारणे दाखविण्यासाठी;

(ii) मूळ अर्जाच्या अनु. क्र. ३ए अंतर्गत अर्जदारांनी विनिर्दिष्ट केलेल्या मिळकती आणि मत्तांव्यतिरिक्त अन्य मिळकती आणि मत्तांचे तपशील जाहीर करणे;

(iii) मिळकतींच्या जप्तीसाठीच्या अर्जावरील सुनावणी आणि निकाल प्रलंबित असल्याने मूळ अर्जाच्या अनु. क्रमांक अंतर्गत जाहीर केलेल्या अशा अन्य मत्ता आणि मिळकतींचा आणि तारण मत्तांचा व्यवहार करण्यास किंवा त्या निकाली काढण्यास तुम्हाला मज्जाव करण्यात आला आहे.

(iv) तुम्ही न्यायाधिकरणाची पूर्व परवानगी घेतल्याखेरीज ज्यावर तारण हितसंबंध बनवले आहेत त्या कोणत्याही मत्तांची आणि/किंवा मूळ अर्जाच्या अनु. क्रमांक ३ ए अंतर्गत जाहीर किंवा विनिर्दिष्ट केलेल्या अन्य मत्ता आणि मिळकतींचे त्यांच्या व्यवसायाच्या सामान्य कामकाजाव्यतिरिक्त विक्री, भाडेपट्टा किंवा अन्य प्रकारे हस्तांतरण करणार नाहीत.

(v) व्यवसायाच्या नियमित कामकाजाच्या ओघांत तारण मत्ता किंवा अन्य मत्ता व मिळकती यांच्या विक्रीतून रोकड झालेल्या विक्री रकमेचा हिशोब देण्यास तुम्ही बांधील असाल व अशी विक्री रक्कम अशा मत्तांवर तारण हितसंबंध धारण करणाऱ्या बँक किंवा वित्तीय संस्थेकडे ठेवलेल्या खात्यामध्ये जमा केली पाहिजे.

तुम्हाला **२७/०३/२०२५ रोजी सकाळी १०.३० वा.** लेखी निवेदन सादर करून त्याची एक प्रत अर्जदारांना सादर करण्याचे व प्रबंधकांसमोर हजर राहण्याचे देखील निर्देश देण्यात येत आहेत, कसूर केल्यास, तुमच्या गैरहजेरीत अर्जावर सुनावणी होऊन निकाल दिला जाईल.

माझ्या हस्ते आणि ह्या न्यायाधिकरणाच्या शिक्क्याने ह्या दिनांक: १०/०२/२०२५ रोजी दिले.

समन्स जारी करणाऱ्या प्राधिकृत अधिकाऱ्याची सही
सही/- (संजय जैसवाल)
प्रबंधक, डीआरटी-III, मुंबई

शिक्का

आयबीसी, २०१६ अन्वये ई-लिलाव सूचना
जनरल कंपोझिटस प्रायव्हेट लिमिटेड (समापनातील)

नों. का: २१ मोनिष बिल्डिंग, एल बी एस मार्ग, जॉन्सन अँड जॉन्सन समोर, मुलुंड पश्चिम, मुंबई - ४०००८०, महाराष्ट्र, भारत - ४०००८०

समापन संपत्तीचा भाग बनणाऱ्या **जनरल कंपोझिटस प्रायव्हेट लिमिटेड (समापनातील) सीआयएन : यु३५३०३एमएच१९९५पीटीसी०८५०४८** च्या खालील मत्ता आणि मिळकती परिसमापकांकडून ई-लिलावाने - **एक कार्यरत कंपनी म्हणून समापन किंवा मंद विक्री म्हणून समापन** यासाठी आहेत. निम्नस्वाक्षरीकारांकडून ई-लिलाव फ्लॅटफॉर्म : **https://nesl.co.in/auction-notices-under-ibc/** वरून ई-लिलाव केला जाईल (प्रत्येकी ५ मिनिटांच्या अमर्याद एक्स्टेन्शनसह)

अ. क्र.	मत्ता वर्णन	राखीव किंमत रु.
१	जमीन आणि इमारत, प्लांट आणि मशिनरी आणि वित्तीय मत्ता व रोखे समाविष्ट एक कार्यरत कंपनी म्हणून समापन : ई-लिलाव २०.०३.२०२५ दु. १२.३० ते दु. २.०० पाच मिनिटांच्या अमर्याद एकस्टेंशनसह. किंवा जमीन आणि इमारत, प्लांट आणि मशिनरी आणि वित्तीय मत्ता आणि रोखे समाविष्ट असलेली मंद विक्री म्हणून समापन. ई-लिलाव २०.०३.२०२५ दु. ३.३० ते सायं. ५.०० पाच मिनिटांच्या अमर्याद एकस्टेन्शनसह. अर्जदार किंवा बोलीदार यांना ते एक कार्यरत कंपनी म्हणून समापन किंवा मंद विक्री म्हणून समापन मध्ये अर्जदार/बोलीदार इच्छुक आहेत त्या ई-लिलावाबाबत कळवणे आवश्यक आहे, कसूर केल्यास असे गृहीत धरले जाईल की, ते एक कार्यरत कंपनी म्हणून समापनात बोली लावण्यास इच्छुक आहेत. फक्त एक कार्यरत कंपनी म्हणून समापनाच्या ई-लिलावात कोणत्याही पात्र अर्जदाराने इअर जमा केली नाही तरच मंद विक्री म्हणून समापनाच्या ई-लिलाव आयोजित होईल. **जमीन व बिल्डिंग - सुमारे ४२,२०० चौ. मीटर्स जमीन, गाव-लाहे, सर्व्हे क्र. २०८, ३०२ आणि ३०३,** विकास इंडस्ट्रीज जवळ, मुंबई आग्रा नॅशनल हायवे, तालुका शहापूर, जि. ठाणे, महाराष्ट्र **आरसीसीची इंडस्ट्रीयल बिल्डिंग व ए. सी. शेड टाईप सुमारे एरिया २९७४ चौ. मी.** आणि प्लांट व मशिनरी आणि वित्तीय मत्ता आणि रोखे. **मत्तांच्या वर्णनासाठी ई-लिलाव वेबसाईट म्हणजेच https://nesl.co.in/auction-notices-under-ibc/ वरील ई-लिलाव दस्तावेज बघा किंवा ई-मेल ने : dpsampat@sampatas-sociates.in, ip.generalcpl@gmail.com मार्फत बघावे.**	रु. १४,९९,००,०००/- (रु. चौदा कोटी नव्याण्णव लाख मात्र)

ई-लिलाव साठी महत्त्वाच्या तारखांचे परिशिष्ट

बोली दस्तावेज सादर करण्यासाठी अंतिम तारीख	**११ मार्च, २०२५, सायं. ५.०० वा.**
मिळकतीचे निरीक्षण	**१२ - १७ मार्च, २०२५**
दस्तावेज काळजीपूर्वक पाहणे	**१२ - १७ मार्च, २०२५**
इअर प्रदानाची अंतिम तारीख	**१८ मार्च, २०२५, सायं. ५.०० वा.**
ई-लिलावाची तारीख आणि वेळ	**२० मार्च २०२५** कार्यरत कंपनी म्हणून समापन - दु. १२.३० ते दु. २.०० किंवा मंद विक्री म्हणून समापन - दु. ३.३० ते सायं. ५.००
सर्वोच्च बोलीदाराची घोषणा	**२१ मार्च २०२५**
यशस्वी बोलीदारांची घोषणा	**२६ मार्च २०२५**

१. इच्छुक अर्जदार सेवा पुरवठादारांची वेबपोर्टल **https://nesl.co.in/auction-notices-under-ibc/** वर उपलब्ध किंवा ई-मेल ने : dpsampat@sampatassociates.in मार्फत ऑनलाईन ई-लिलावाच्या अटी व शर्ती, ई-लिलाव बोली प्रपत्र, पात्रता निकष, बोलीदारांकडून घोषणापत्र, इअर आवश्यकता इ. असलेल्या **संपूर्ण ई-लिलाव प्रक्रिया माहिती दस्तावेज** अनिवार्यपणे वाचून मान्य केल्यानंतर सहभागी होतील.

२. परिसमापकांना कोणत्याही टप्प्यावर स्विकारण्याचे किंवा रद्द करण्याचे किंवा ई-लिलावाच्या कोणत्याही अटी व शर्ती वाढवणे किंवा सुधारण्याचे निर्विवाद अधिकार आहेत. कोणतीही कारणे न देता कोणतीही बोली फेटाळण्याचे अधिकार त्यांना आहेत.

३. राखीव किंमतीच्या १०% ची इअर ची अंतिम तारीख १८ मार्च, २०२५ रोजी सं. ५.०० वा. आणि दस्तावेज सादर करण्याची अंतिम मुदत ११ मार्च, २०२५ रोजी भाप्रवे सं. ५.०० वा. आणि ई-लिलाव २० मार्च, २०२५ रोजी कार्यरत कंपनी म्हणून समापन दु. १२.३० ते दु. २.०० किंवा मंद विक्री म्हणून समापन दु. ३.३० ते सं. ५.००
सर्वांनी ईमेल : dpsampat@sampatassociates.in कडून भेटी पूर्वी किमान १ दिवस आधी आवश्यकतेनुसार फोटो आयडी आणि प्रतिज्ञापत्रासह प्रत्यक्ष स्थळी भेटीची (१२-१७ मार्च २०२५) परवानगी घेणे आवश्यक आहे. शेवटच्या क्षणी केलेली विनंती विचारात घेतली जाईल असे नाही.

४. ई-लिलाव फक्त 'जसे आहे जेथे आहे तत्त्वाने', 'जसे आहे जे आहे तत्त्वाने' 'जे काही आहे तेथे आहे तत्त्वाने' आणि "कोणाच्याही मदतीशिवाय तत्त्वाने" होईल आणि लिलाव कोणत्याही स्वरूपाच्या सवलती, हमी आणि क्षतीपूर्तीशिवाय होईल.

५. इअरचे प्रदान एकतर खात्यामध्ये किंवा डिमांड ड्राफ्टमार्फत करता येईल.

६. जर ई-लिलाव समाप्तीच्या वेळेच्या शेवटच्या ५ मिनिटात बोली लावली तर अमर्याद अशा ५ मिनिटांसाठी समाप्तीची वेळ आपोआप वाढेल.

७. विक्री मोबदला याचे प्रदान ई-लिलाव मंजुरी पत्रानंतर ९० (नव्वद) दिवसांआधी केलेल्या कोणत्याही प्रदानावर दर साल १२% (बारा टक्के) दराने व्याज लागेल.

८. बोलीदार एक हमीपत्र देतील की, बोलीदार इन्सॉल्वन्सी ॲण्ड बँकरप्टसी कोड, २०१६ च्या कलम २९ए अंतर्गत कोणत्याही अपात्रते अंतर्गत नाहीत आणि जर कोणत्याही वेळी इन्सॉल्वन्सी ॲण्ड बँकरप्टसी कोड, २०१६च्या कलम २९ए अंतर्गत बोलीदार अपात्र आढळले तर जमा केलेली इसारा रक्कम जप्त होईल.

दिनांक : २१/०२/२०२५ सही/-
ठिकाण : मुंबई सीए देवांग पी. संपत
परिसमापक जनरल कंपोझिटस प्रा. लि.
आयबीबीआय/आयपीए-००१/आयपी-पी००२२२४/२०१७-१८/१०४२३

जाहीर सूचना

सूचना याद्वारे देण्यात येते की आम्ही, **श्री. दारायस मिनू मिस्त्री,** राहणार येथे, ८, आयव्हानहो, ३रा मजला, १३९, जनरल जगन्नाथ भोसले मार्ग, नरिमन पॉईंट, मुंबई - ४०० ०२१ ("मालक") यांचे मालकी हक्क, नामाधिकार आणि हितसंबंध यांची चौकशी करत आहोत, जे त्यांनी 'मालकी हक्काच्या तत्त्वावर' विकत घेतलेले आहेत, म्हणजेच : (१) फ्लॅट क्र. ११०५, मोजमापित सुमारे १,६२८ चौ. फू. असून त्यामध्ये रेरा अंतर्गत चटई क्षेत्र १,५९३.४७ चौ. फू. आणि उपयुक्त क्षेत्र ३४.३५ चौ. फू. समाविष्ट आहे, जो ११व्या मजल्यावर आहे (**'सदर फ्लॅट'**) आणि (२) बेसमेंट- १ येथे असलेल्या दोन पार्किंग जागा, ज्यांचे क्र. बी १-२९९ आणि बी १-३०० आहेत, या सदर फ्लॅटला संलग्न असलेल्या सुविधा म्हणून (**'सदर कार पार्किंग जागा'**) 'टू आयसीसी' (**'सदर इमारत'**) या इमारतीत स्थित आहेत. सदर इमारत कॅडस्ट्रल सर्व्हे क्र. २२३, १२०, १/९८३ आणि १/१२८ धारक, दादर नायगाव विभाग, जी. डी. आंबेकर मार्ग, दादर पूर्व, मुंबई - ४०० ०१४ (**'सदर जमीन'**) या सर्व मिळकतींवर उभारण्यात आलेली आहे आणि सदर इमारतीतील इतर खरेदीदारांसोबत सर्वसामाईक क्षेत्रे व सुविधा वापरण्याचा व आनंद घेण्याचा अधिकार यामध्ये अंतर्भूत आहे. सदर फ्लॅट व सदर पार्किंग जागा यास सामाईकरित्या **'सदर परिसर'** असे संबोधले जाईल.

सदर मालमत्ता किंवा त्यातील कोणत्याही भागावर कोणतेही हक्क, नामाधिकार, लाभ, मालकी हक्क, हरकत, मागणी किंवा स्वारस्य कोणत्याही स्वरूपात असल्यास, तसेच मालकाविरुद्ध किंवा कोणत्याही करार, लिव्ह ॲण्ड लायसन्स, विक्री, हस्तांतरण, अभिहस्तांकन, गहाण, धारणाधिकार, प्रभार, विश्वस्त, कराराचे दायित्व, भेट, भाडेपट्टी, पोट-भाडेपट्टी, अधीन भाडेपट्टी, अदलाबदल, वारसा, ताबा, भाडेकरार, पोटभाडे करार, कब्जा, उपयोजनाधिकार, इतर हक्क, अटी, करारनामा, हिस्सा, देखभाल, बोजा किंवा अन्य कोणत्याही स्वरूपाचे कोणतेही करार, अभिहस्तांतरण विलेख, लेखी दस्तऐवज, इच्छापत्र, वारसा, कौटुंबिक व्यवस्थापन/तडजोड, वाद, हुकूम किंवा न्यायालयाच्या आदेशाद्वारे काहीही दावा असल्यास, त्यांनी ही बाब लेखी स्वरूपात तसेच कागदपत्रांची नोटरी प्रमाणित सत्यप्रतींसह, खालील अधोस्वाक्षरीकारांना त्यांचे कार्यालय **मे. वाडिया गांधी ॲंड कंपनी, वकील, सॉलिसिटर आणि नोटरी, एन. एम. वाडिया बिल्डिंग, दुसरा मजला, १२३, महात्मा गांधी रोड, फोर्ट, मुंबई - ४०० ००१** येथे आणि ई-मेल: **denzil.arambhan@wadiaghandy.com** द्वारे सदर सूचनेच्या प्रकाशनाच्या दिनांकापासून १४ (चौदा) दिवसांच्या आत लेखी स्वरूपात सादर करावी, कसूर केल्यास, असे दावे, अधिकार, नामाधिकार, इस्टेट किंवा हितसंबंध माफ आणि/किंवा सोडून दिले आहेत असे मानले जाईल.

दिनांकित २२ फेब्रुवारी, २०२५.

वाडिया घांदी ॲण्ड कं. करिता
डेंझिल आरंभन
भागीदार

जाहीर सूचना

कृपया नोंद घ्यावी की, मोबाईल क्र. ७९९७९३२५९० आणि ८८६१७६४१७० धारक व्हॉट्सॲप ग्रुप, म्हणजेच "बी१ जीनियस कॅपिटल"मार्फत सायबर गुन्हेगारीसाठी कंपनीचा तपशील आणि लोगोचा वापर होत असल्याचे आम्हाला माहिती मिळाली आहे, ज्यांनी "निर्माई आयएनटी" इंटरनॅशनल अकाऊंट प्लॅटफॉर्म/ "निर्माई इंटरनॅशनल ट्रेडिंग प्लॅटफॉर्म" मार्फत सिक्युरिटीज सल्लागार सेवा पुरविण्यासाठी दावा करित आहे आणि एक व्यक्ती, म्हणजेच "श्री. विजय ठाकूर" यांनी "Guru Genius. AI" नावाचे एक ॲप्लिकेशन सुरू केल्याचा दावा केला आहे, आणि ज्यांनी "निर्माई आयएनटी"/ "निर्माई इंटरनॅशनल ट्रेडिंग प्लॅटफॉर्म" जे निर्मल बंगची उपकंपनी असून, सदर सह संबंधित असल्याचा दावा केला आहे, आणि सदर सेबी नोंदणी क्रमांक आयएनझेड०००२०२५३६ म्हणून दाखवले आहे, तथापि सदर सेबी नोंदणी क्रमांक आमच्या संस्थेच्या असून आणि सदर आमची वेबसाईट, म्हणजे https://www.nirmalbang.com वर उपलब्ध आहे. परंतु त्यांनी आमचे सेबी नोंदणी क्रमांकांचा अवैध वापर केला आहे.

आम्ही जनतेस खबरदारीचा इशारा देण्यात येतो की, वरील मोबाईल क्रमांक/ व्हॉट्सॲप ग्रुप/ संकेतस्थळ आणि "श्री. विजय ठाकूर" यांच्याशी आमच्या वतीने कोणतेही आर्थिक व्यवहार करू नयेत. कृपया त्यांच्या मार्फत आमच्या नावाने कोणताही व्यवहार करणेपासून टाळण्यात यावा कारण ते आमच्या संस्थेशी संबंधित नाहीत, किंवा आमच्या संस्थेचा सहयोगी नाही, किंवा अधिकृत व्यक्ति म्हणून नोंदणीकृत नाही, किंवा आमच्या संस्थेच्या वेतनयादीवर नाही, किंवा आमच्या कर्मचारी संघाचा भाग नाहीत. म्हणून त्यांच्यामार्फत केलेल्या कोणत्याही व्यवहारांसाठी जबाबदार राहणार नाही.

गुंतवणूकदारांच्या हितासाठी ही सूचना प्रसिद्ध करण्यात येत आहे.

दिनांक : २२ फेब्रुवारी, २०२५

निरमल बंग सिक्युरिटीज प्रायव्हेट लिमिटेड वतीने,
सही/-
प्राधिकृत स्वाक्षरीकर्ते

पश्चिम रेल्वे

गती शक्ती मल्टी-मोडल कार्गो टर्मिनल विकास करणे

विभागीय रेल्वे व्यवस्थापक (वाणिज्यिक), मुंबई सेंट्रल विभाग, पश्चिम रेल्वे, डीआरएम कार्यालय, तळ मजला, मुंबई सेंट्रल- ४००००८ मागवित आहे. **ई-निविदा क्र.: डब्ल्युआर-एमएमसीटी०सीओएमएम (सीजीजीसी)/३/२०२३/४२१४८१, दि. २०.०२.२०२५. कामाचे नाव:** एचओएल जमिनीवर जीसीटी धोरणानुसार गती शक्ती मल्टी-मोडल कार्गो टर्मिनल (जीसीटी) चा विकास करणे.

ई-निविदा दस्तावेजाची किंमत (गैर परताव्या योग्य आणि गैर हस्तांतरयोग्य): रू. १०,०००/. **ईएमडी:** रू. १,७८,३८,४००/-. **ई-निविदा सादर करण्याची वेळ आणि तारीख:** १८.०३.२०२५ रोजीस, १५.०० वा. ऑनलाईन. **ई-निविदा उघडण्याची वेळ आणि तारीख:** १८.०३.२०२५ रोजीस १५.३० वा. **पुढील तपशीलाकरिता कृपया आमची वेबसाईट www.ireps.gov.in** ला भेट द्या. **1102**

आम्हाला लाईक करा : facebook.com/WesternRly

बँक ऑफ़ बड़ौदा Bank of Baroda

महेश्वरी उद्यान शाखा, माटुंगा
४६७-ए, व्होरा भुवन, माटुंगा सेंट्रल रेल्वे, मुंबई, महाराष्ट्र, ४०००१९
फोन : ०२२-२४१० ६२३६,
ईमेल : dbmatu@bank